# प्रकरण - १

# "सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील ग्रामीण नेतृत्वाचा एक अभ्यास"

## प्रास्ताविक

"सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील ग्रामीण नेतृत्वाचा एक अभ्यास" हा विषय एम. फिल. च्या शोधनिबंधासाठी निवडला आहे. या विषयाची निवड करीत असताना काही उद्देश समोर ठेवला होता. त्यादृष्टीने अभ्यासाची दिशा निश्चित केलेली होती.

नेतृत्व ही संज्ञा आपल्या नित्य परिचयाची असली आणि तिचे महत्वही स्पष्टपणे जाणवत असले तरी नेतृत्व म्हणजे काय? या प्रश्नाचे सोपे सुटसुटीत व सर्वसमावेश उत्तर थोडक्यात देणे मात्र खूपच कठीण जाते. नेतृत्वाचे आणखी एक गमक म्हणजे नेत्याची प्रेरणा देण्याची क्षमता किंवा मानवी कर्मशक्ती ही प्रेरणेवर काम करते असा सिद्धांत आहे. प्राचीन काळापासून प्रत्येक समाजात पुढारी आणि अनुयायी असे दोन वर्ग अस्तित्वात होते आणि आजही आहेत. समाजाच्या नेतृत्वाचे कार्य करणे हे पुढाऱ्यांचे आणि पुढाऱ्यांकडून मार्गदर्शनाची अपेक्षा करणे हे अनुयायांचे कार्य आहे. राजकीय जीवनातसुद्धा नेतृत्वाची आवश्यकता असते. अशा राजकीय नेतृत्वाचे स्वरूप कोणते? ते नेतृत्व कोणाला आणि कोणत्या आधारावर प्राप्त होते? त्या नेतृत्वाचा अविष्कार कसा घडतो? इत्यादीचा अभ्यास राज्यशास्त्राच्यादृष्टीने करणे आज आवश्यक झाले आहे. प्रभाव पाडणारी व्यक्ती म्हणजेच पुढारी होत. परिस्थिती बदलताच नेतृत्वातही बदल झालेला दिसतो. परिस्थितीनुसार अनुयायी आणि नेते ह्यांच्यामध्ये अदलाबदल होत असते. विकसनशील देशात नेते लोकच राष्ट्राची ध्येयधोरणे निश्चित करतात. नवीन विचारसरणी आणि चांगले नेतृत्व निर्माण होण्यासाठी शिक्षण आणि संस्कार ह्यांची गरज असते. आधुनिक काळात नेतृत्वाचा आणि नेतृत्व बदलाचा विचार करण्यात आला. पारंपरिक नेतृत्व प्रामुख्याने जात, वर्ग किंवा विशिष्ट समूह यांच्या सदस्यत्वामुळेच निर्माण झाले होते. परंतु आधुनिक काळात लोकशाही आणि जनतेची सार्वभौम सत्ता ह्या संकल्पनांचा स्वीकार आणि प्रसार झाला आहे. राजकारण आणि राजकीय प्रक्रिया ह्यांचे स्वरूप जसजसे बदलत गेले तसतसे नेतृत्व

पद्धतीत बदल घडत गेला. लोकशाही राजकीय व्यवस्थेत निवडणुकांना फार महत्त्व असते. निवडणुकीमुळे राजकीय नेतृत्वात बदल होतो. त्यामुळे कधी कधी तळाशी असलेले नेतृत्व शिखरापर्यंत पोहचते तर कधी शिखरावर असलेले नेतृत्व भूईसपाट होते. पूर्वीचे राजकीय पुढारी समाजातील विशिष्ट स्तरातून निर्माण होत. आज परिस्थिती बदललेली आहे. नेतृत्व व व्यक्ती ह्यात फरक करण्यात येतो. राज्याची सत्ता संविधान आणि विधी यानुसार संघटीत झालेली आहे. सत्ता ही पदाला प्राप्त झालेली असते; व्यक्तीला नाही. पदाच्या सीमा एकप्रकारे मर्यादित झालेल्या असतात. व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप या गुणावर आधारीत पूर्वीची नेतृत्वाची कल्पना आज अमान्य झालेली आहे. नेतृत्वाचा अभ्यास आज दोन दृष्टीने होत आहे. लहानलहान गटांच्या आधारे नेतृत्व अभ्यास करणे ही एक पद्धती आहे तर दुसरी पद्धती म्हणजे मोठ्या स्तरावर म्हणजे राष्ट्राच्या स्तरावर नेतृत्वाचा अभ्यास करणे ही होय.

अशा पद्धतीने नेतृत्व उदयाला येते. भारताने लोकशाहीचा पुरस्कार केला असल्यामुळे अनेक प्रकारची नेतृत्व उदयाला आली. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताचे थोर महात्मे, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, नेताची सुभाषचंद्र बोस, पंडित जवाहरलाल नेहरु इत्यादी अनेक थोर व्यक्तींच्या डोळ्यासमोर एक स्वप्न होते. या विचाराचा एक परिणाम म्हणून महाराष्ट्रातून अनेक ग्रामीण नेतृत्व पुढे येऊ लागली आणि प्रागतिक विचाराच्या महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, विठ्ठलराव विखे-पाटील, यशवंतराव मोहिते, बाळासाहेब देसाई, भाऊसाहेब हिरे, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख असे महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सहकार व शिक्षण क्षेत्रात नेतृत्व पुढे आहे. या परंपरेत वाढलेले व स्वतःचा वेगळा ठसा उमटवणारे सोलापूर जिल्हयात कर्तृत्वाचा डोंगर उभा करणारे नेतृत्व म्हणजे सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील होय. एका गरीब शेतकरी कुटुंबात जन्म घेवून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाऊन त्यांनी अतिशय प्रगती केली आहे. यामागे त्यांचे प्रेरणास्त्रोत कोणते? सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांचे सामाजिक योगदान काय? या प्रश्नांची उत्तरे शोधून सहकारमहर्षिंच्या कार्याचा सामाजिक, राजकीय, सहकार व शिक्षण या दृष्टीकोनातून अभ्यास करणे आवश्यक आहे. सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाचा



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

विकास होत असताना त्या काळातील परिस्थितीचा परिणाम त्यांच्यावर कसा होतो याचा सैद्धांतिक पातळीवर विचार करणे गरजेचे वाटते. म्हणून यासंबंधी अभ्यास केलेला आहे. एखाद्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास करीत असताना त्या कालखंडातील राजकीय विकासाची प्रक्रिया समजून घेता येवू शकते. म्हणूनच हा विषय अभ्यासासाठी निश्चित करुन सैद्धांतिक बाजूने संबंध राजकीय विकसाची प्रक्रिया समजावून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.

सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाचा पुढील पाच भागाच्या आधारे अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

पहिल्या भागामध्ये सहकारमहर्षिंचे बालपण कशाप्रकारे विकसित होत गेले याची माहिती दिली आहे. तसेच शंकररावजींचे दोन्ही घराण्याची कौटुंबिक माहिती व शिक्षण घेत असताना आलेल्या अडचणी व शाळा सोडण्याचे कारण काय? त्याचप्रमाणे अकलूज हे गाव पूर्ण देशामध्येसुद्धा प्रसिद्ध आहे. त्यामुळे अकलूज गावाची व्युत्पत्ती कशा पद्धतीने झाली याचीही सखोल माहिती यामध्ये दिली आहे. तसेच शंकररावजी एवढे मोठे झाले. परंतु त्यांना प्रेरणा किंवा मार्गदर्शन व प्रभाव कोणकोणत्या व्यक्तींचे लाभले याचाही उल्लेख यामध्ये आहे. तसेच शंकररावजींच्या स्वभावगुणांचा उल्लेखही यामध्ये केलेला आहे. त्याचप्रमाणे भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेकांचा सहभाग असलेला दिसून येतो. शंकररावजी स्वातंत्र्यलढ्यात प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष कशाप्रकारे सहभागी झाले याची सविस्तर माहिती या प्रकरणामध्ये दिसून येते.

सहकारमहर्षिंचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य दुसऱ्या प्रकरणामध्ये विशद केले आहे. स्वतःला फी चे पैसे भरायला गरीबीमुळे मिळाले नाहीत म्हणून शाळा सोडावी लागली याची जाणीव सतत त्यांना होत होती. आपल्यासारखी परिस्थिती इतरांवरती येऊ नये म्हणून त्यांनी प्रथमतः वसतिगृह व नंतर शिक्षण संस्थेची स्थापना केली. या शिक्षणसंस्थेच्या शाखा शहरापेक्षा भरपूर प्रमाणात ग्रामीण भागात असलेल्या दिसून येतात. या ठिकाणी प्रवेश व परीक्षा फी अगदी माफक प्रमाणात असल्याचे दिसून येते. या संस्थेचे अनेक विद्यार्थी आज अत्यंत उच्च पदावर विराजमान झालेले आहेत.

तिसऱ्या प्रकरणामध्ये सहकारमहर्षिंचे सामाजिक व शेतीविषयक कार्य याचा आढावा घेतला आहे. त्यांचे सामाजिक व शेतीविषयक कार्य अतिशय मोलाचे आहे. समाजातील गरीब लोकांना सतत मदत करणे, त्यांची विचारपूस करणे व त्यांना आर्थिक स्वरूपात मदत करण्याचे काम ते करीत असत. "जीवात जीवमान असेपर्यंत जनसेवाच करू" हे त्यांचे ध्येय होते. ते समाजातील सर्वसामान्य लोकांना सावकारी करणाऱ्या लोकांकडून व्याजाने पैसे घेण्यापेक्षा कमी व्याजाने बँकेकडून व पतसंस्थेकडून पैसे घेण्यास भाग पाडत. तसेच शेतकऱ्यांना शेतीच्या पिकांच्या उत्पादनाला चांगला भाव मिळाला पाहिजे म्हणून संघर्ष करत. शेतकरी हा जीवनाचा आधारस्तंभ आहे असे ते म्हणत असत. शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करावी व भरघोस उत्पन्न मिळवावे यासाठी ते प्रयत्न करीत असत.

शंकररावजींचे सहकार व औद्योगिक क्षेत्रातील कार्य याविषयीचा आढावा चौथ्या प्रकरणात घेण्यात आलेला आहे. सहकार व औद्योगिक क्षेत्रात शंकररावजींचे अतिशय भरीव स्वरूपाचे कार्य आहे. सहकारामुळेच त्यांनी प्रचंड प्रगती केलेली दिसून येते. त्यांनी सहकार क्षेत्रात अत्यंत तळागाळापासून ते उच्च पदापर्यंत मजल मारलेली आहे. सहकारमहर्षि अकलूज विकास सेवा सोसायटीचे सदस्य म्हणून प्रथम सहकार क्षेत्रात सुरुवात केली व नंतर वेगवेगळी पदे मिळवत सहकार क्षेत्रातील सर्वोच्च पद म्हणजे राज्य साखर संघाचे अध्यक्षपद होय. या पदावरतीसुद्धा शंकररावजींनी काम केले आहे. त्यामुळे सहकार क्षेत्रातला प्रदीर्घ अनुभव त्यांना होता. औद्योगिकबाबतीत अनेक संस्था स्थापन करुन त्यांनी भरीव स्वरूपाचे कार्य केलेले आहे.

पाचव्या प्रकरणामध्ये शंकररावजींच्या राजकीय कारकीर्दीविषयीचा अभ्यास करण्यात आला आहे. शंकररावजींनी राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांनी ग्रामपंचायत सरपंचपदापासून राजकीय कार्यास प्रारंभ केला. ते आमदार झाले व सतत आमदार झाल्यामुळे मंत्रीपदाची ऑफरसुद्धा त्यांना आली. परंतु त्यांनी ती स्वीकारली नाही. कारण मतदारसंघाचा प्रथम चांगल्याप्रकारे विकास करावयाचा आहे असे त्यांनी ठरविले होते. तसेच काँग्रेस पक्ष वाढविण्यासाठी त्यांचा मोठा वाटा असल्याचे दिसून येते. वसंतदादा पाटील व यशवंतराव मोहिते यांचे त्यांना भरपूर सहकार्य मिळालेले होते. त्यांनी सोलापूर जिल्हयातील सर्वच्या सर्व सत्तास्थाने आपल्या कामगिरीच्या

जोरावरती आपल्याकडे घेतलेली दिसून येतात. जिल्हा परिषद, दूध संघ, जिल्हा मध्यवर्ती बँक, पंचायत समित्या यांच्यावरती त्यांचे सर्व नियंत्रण होते. तोच वारसा सध्याही सोलापूर जिल्हयात असलेला दिसून येतो.

या शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी ऐतिहासिक शोध पद्धतीचा वापर केलेला आहे. यात शासकीय कागदपत्रे, पक्षाची प्रकाशित पत्रके व पुस्तिका, वृत्तपत्रे, नियतकालिके, संशोधन पत्रिका, शोधनिबंध व ग्रंथालयातील पुस्तके यांचा मुख्यत्वे वापर करण्यात आलेला आहे. या साधनाबरोबर सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांच्या सहवासातील सहकारी व्यक्तींशी चर्चा करुन तसेच सहकारमहर्षि यांच्या जीवनकार्यावरती आधारीत स्मरणिका व वेगवेगळ्या प्रकारच्या स्थापन केलेल्या शैक्षणिक व सहकारी संस्थांचे वार्षिक अहवाल यांचाही आधार घेण्यात आला आहे.

या शोधनिबंधाचा अभ्यास करीत असताना शिवाजी विद्यापीठातील बॅ. खर्डेकर ग्रंथालय, शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय ग्रंथालय, अकलूज. विजयसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय ग्रंथालय, नातेपुते, दैनिक लोकसत्ता, दैनिक लोकमत, दैनिक पुढारी, दैनिक सकाळ, दैनिक महाराष्ट्र टाईम्स इत्यादी वृत्तपत्रांचा उपयोग झाला आहे.

अशा प्रकारच्या विविध साधनांच्या आधारे 'सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील - ग्रामीण नेतृत्वाचा एक अभ्यास' या शोधनिबंधाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या शोधनिबंधाचा उपयोग २१ व्या शतकात भेडसावणारे प्रश्न सोडविण्यासाठी निश्चित होईल. सहकारमहर्षिंच्या नेतृत्वाखाली माळशिरस मतदारसंघात जे उद्योग उभा राहिलेले आहेत त्याला महाराष्ट्रात तोड नाही. त्यामुळे त्यांचा आदर्श घेऊन इतरत्र असे कार्य करण्यास चालना मिळू शकते. भारतासारख्या देशाच्या सर्वांगिण विकासासाठी सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांच्यासारखे कर्तृत्ववान नेतृत्व प्रत्येक विधानसभा व लोकसभा मतदारसंघात निर्माण होणे काळाची गरज आहे. तरच भारत देश प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल व २०२० साली राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुलकलाम यांच्या स्वप्नातील भारत संपन्न आणि समृद्ध असेल.

सहकारमहर्षि



कै. शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील

## प्रकरण पहिले

# सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचे बालपण व स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग

**प्रस्तावना**

महाराष्ट्र राज्यातील सोलापूर हा एक जिल्हा आहे. त्यालाच स्वातंत्र्यवीरांचा जिल्हा असे म्हणतात. अनेक शूर लोक, स्वातंत्र्यवीर, सामाजिक विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, नट, कलाकार या सोलापूर जिल्हयानेच महाराष्ट्राला, अखिल भारताला दिले आहेत. सर्वच क्षेत्रात सोलापूर जिल्हयाने आपले नांव मिळविले आहे. या सर्वच क्षेत्रात मोलाचा कायापालट घडवून आणणाऱ्या व्यक्ती आपआपल्यापरीने थोर आहेत. पण या सर्वच क्षेत्रात सहकार, शिक्षण, शेती तसेच राजकीय व औद्योगिक क्षेत्रात मोलाचे कार्य करणारे सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील हे एक महत्त्वपूर्ण असे व्यक्तीमत्त्व आहे. त्यांची प्रत्यक्ष कर्मभूमी म्हणजे सोलापूर जिल्हयातील 'खेडी' होय. त्यामुळेच या जिल्हयात व खेडोपाड्यात त्यांच्या कार्याचे पडसाद उमटलेले दिसतात व या भागातील लोक त्यांना त्यांच्या अमूल्य कार्याबद्दल दुवा देताना दिसतात.

अशा या जिल्हयात जन्माला आलेल्या सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेताना त्यांच्या कालखंडाचा विचार करणे आवश्यक आहे. यामध्ये सर्वसाधारणपणे १९१८ ते १९७९ या ६१ वर्षाच्या कालखंडाचा विचार करावा लागेल.

**जन्म, कौटुंबिक माहिती व शिक्षण**

"सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचा जन्म सोलापूर जिल्हयातील माळशिरस तालुक्यामध्ये वेळापूर या खेडेगावात एका गरीब शेतकरी कुटुंबात दि. १४ जानेवारी १९१८ रोजी मकर संक्रातीदिवशी झाला. त्यादिवशी सोमवार होता म्हणून आईवडिलांनी त्यांचे नाव शंकर असे ठेवले. शंकरराव मोहिते-पाटील यांचेबाबत त्यावेळच्या काळात जर कोणी हे शंकरराव मोहिते-पाटील हे शेतकऱ्यांचे नेते बनून लाखो लोकांचे पोशिंदे ठरतील असे भविष्य सांगितले असते तर ते कोणालाही खरे वाटले नसते.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

परंतु ते नियतीने खरे करून दाखविले. माने-देशमुख कुटुंबात जन्म घेवून मोहिते-पाटील कुटुंबाचा वंश चालवित दोन्ही कुटुंबांचा उध्दार साधण्याचे कार्य त्यांच्याशिवाय कोणी करू शकेल असे वाटत नाही. दैववंशांत त्यांच्या आजीला ते दत्तक गेले व त्यामुळेच ते मोहिते-पाटील झाले."[१]

अकलूज गावात हंबीरराव मोहिते यांचे बंधू शेतीवाडी करून रहात होते. या मोहिते घराण्यात नारायणराव मोहिते अकलूज गावचे पाटील होते. त्यांच्या पत्नी कै. लक्ष्मीबाई या सणसर येथील कै. पांडुरंगराव निंबाळकर यांच्या भगिनी होत. या दांपत्याच्या पोटी कै. राधाबाई, कै. कृष्णाबाई व कै. मथुराबाई या तीन मुलींचा जन्म झाला. या तिन्ही मुली वेळापूर गावी नरसिंगराव देशमुख यांच्या मुलांना दिल्या होत्या. नरसिंगराव माने यांना साहेबराव, गणपतराव, भोजराव आणि अनंतराव माने-देशमुख हे चार पुत्र होते. त्याकाळी नरसिंगराव देशमुख यांच्या पश्चात त्यांचे वडीलपुत्र साहेबराव, नरसिंगराव माने-देशमुख यांनी आपले धाकटे बंधू गणपतराव नरसिंगराव माने-देशमुख यांचा नारायणराव मोहित्यांची वडील मुलगी राधाबाई यांच्याशी विवाह करून दिला. या विवाहानंतर साहेबराव माने-देशमुख हे अकलूज गावची पाटीलकी करीत होते. अकलूज गावच्या बाजारतळ्याचे उत्पन्न रानोशी व पाटील यांना होते. त्यापैकी पाटील यांना बारा आणे व रामोशी यांचा चार आणे होते. त्यांचे तीन नंबरचे बंधू भोजराव माने-देशमुख यांना दत्तक घेतले होते. त्यांचे नातू श्री. दिनकरराव, गुलाबराव तथा बाबुराव माने-देशमुख हे सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर होते. साहेबराव यांचे धाकटे बंधू आनंदराव माने-देशमुख यांचा मोहित्यांची दुसरी मुलगी कृष्णाबाई यांच्याशी विवाह झाला होता. या विवाहापासून आनंदराव माने-पाटील हे अकलूजची पाटीलकी करू लागले. इतक्यात आपल्या दोन नंबरचे बंधू गणपतराव यांची पहिली पत्नी राधाबाई यांना एक मुलगी होऊन त्या अकाली कालवश झाल्या. त्यांच्या निधनानंतर मोहित्यांची तिसरी मुलगी मथुराबाई यांचा विवाह गणपतराव माने-देशमुख यांच्याशी झाला. या माने घराण्यात आनंदराव नरसिंगराव माने यांना कृष्णाबाईच्या पोटी तीन मुले व तीन मुली झाल्या. त्यापैकी वडील मुलगी जिजाबाई नंतर बाबासाहेब नंतर सुशिलाबाई नंतर

सदाशिवराव नंतर कमल तसेच गणपतराव माने यांना मथुराबाईच्या पोटी व्यंकटराव, हंबीरराव व शांताबाई अशी तीन अपत्ये झाली.[२]

कै. लक्ष्मीबाई मोहिते-पाटील यांनी आपल्या कै. कृष्णाबाई माने या मुलीचा मुलगा शंकरराव माने यांना १९३९ साली दत्तक घेतले. पुढे त्यांचा विवाह सांगली जिल्हयातले मांजर्ड्याचे खराडे-पाटील यांची मुलगी रत्नप्रभाताई यांचेबरोबर तसेच त्यांच्या जनक भगिनी सुशिलाबाई अनंतराव माने-देशमुख यांचा विवाह कृष्णराव जयसिंगराव काळे-देशमुख यांचेबरोबर व शांताबाई गणपतराव माने-देशमुख या त्यांच्या चुलत बहिणीचा विवाह शामराव खाशेराव जगताप यांचेबरोबर असे तिन्ही विवाह एका मंडपात दिनांक २५-५-१९४३ रोजी अकलूज मुक्कामी थाटामाटात झाला.[३]

मुळात कै. लक्ष्मीबाई मोहिते-पाटील यांना अकलूज गावात शेकडो एकर जमिन होती. शिवाय अकलूज गावात मोठा वाडा व मोठी जागा होती. मोहित्यांचे घराणे पूर्वापार श्रीमंत व सुखी होते. या मोहिते घराण्यात कै. शंकरराव मोहिते-पाटील दत्तक गेल्यामुळे त्यांचे कार्यक्षेत्र वाढले.

### अकलूज गावाची व्युत्पत्ती

नीरा आणि भीमा महाराष्ट्रातील दोन जुळ्या बहिणी सराटीजवळ अबलख वळण घेवून नीरा भीमेच्या कुशीत नरसिंहपूरला विसावते आणि या संगमाच्या अलिकडे पाच सहा कोसावर अकलाईचे एक मंदिर आहे. अकलाई, आदिमाया, शिवशक्तीचा अवतार तुळजाभवानीचे रुप घेवून आई आकलाई नीरेच्या काठावर थांबली तिथे निरेला घाट बांधला. एका इतिहास पुरुषानं घाटावर सावली दिली. मंदिर बांधले, देवीला दिवा लावायला गुरव आला, फुल पत्री, माळा घालायला माळी आला, पूजेअर्चेला ब्राह्मण आला, कासार आला, सोनार आला, कुंभार आला, आईच्या परसातल्या जमिनी इतिहास पुरुषांन वाटप करून बलुतेदारांना शेती करायला लावलं. आले ते राहिले, फुलले, बहरले, व्यापले, पाहता पाहता गाव उभा राहिला. देऊळ सकाळ संध्याकाळ गजबजू लागलं. जत्रा भरु लागल्या, अकलाईची पूजा बांधली जाऊ लागली."[४]

गाव वसता वसत गेलं. वाढता वाढत गेलं. गावाच नाव ठेवल आई अकलाई वरून "अकलाईराज" नांव उच्चारायला मोठ लांब त्यामुळे त्याच झाल असाव अकलूज.

"अकलूज गाव काळपुरुषाच्या बोटाला धरुन पावल टाकता टाकता स्वतःच्या पायावर चालू लागलं. अकलूजला स्वतःचा इतिहास आला. यौवनांचे आक्रमण झालं. औरंगजेबाने अकलूज जिंकले. असदखान सरदार मातब्बर मोहरा बादशहाचा. असदखानला अकलूज इनाम म्हणून दिले. त्यान केल अकलूजच असदनगर. नदीकाठी गढी बांधली. बुरजा कपारीची बुलंद इमारत बांधली. अकलूज पुसले गेले. असदनगर नावान महाराष्ट्राच्या नकाशात अंजरीची आसवं लपवत वावरु लागले ते गांव".[५]

अत्याचार वाढले. गावकऱ्याने अकलाईला हाक घातली. "बये दार उघड बये दार उघड" शिवाजी महाराजांनी अवघ्या मराठ मुलखात घोडी दौडवली आणि एक एक सवता सुभा स्वतंत्र होऊ लागला. असदनगर पाहता पाहता शिवाजी महाराजांनी जिंकल आणि नदीकाठच्या घडीवर पुन्हा भगवा फडकवला. आईच्या मंदिरात घंटा बांधली. बेलभंडार उधळला. "आई ग अकलाई तुझा सोन्याचा छुबा, कोल्हापूरचा राजा तुझ्या दर्शनाला उभा."

पुन्हा असदनगरच झालं अकलूज. काळ बदलत गेला. काळाच्या प्रवाहात अकलूज वाढत होत. संभाजीराजांना औरंगजेबान गिरफ्तार केले. त्यावेळी सरदार मोहिते राजघराण्याची चरण शपथ घेवून निघाले. राजाला सोडवून परत आणू तरच मागे येवू. पाठलागावर इथवर आले. ती काळरात्र अकलूजच्या गढीत मराठी मुलखाचा काळीज तुकडा शंभूराजे भोसले रात्रभर गढीत कैद होते. दुसरे दिवशी त्यांना घेवून सैन्याचा मुक्काम हालला. येथून पुढे मोघलाई हद्द सुरु झाली. नदीच्या अलिकडे मोहिते सरदार व्यथीत मनाने बसले. शंभूराजांना काळाने हिरावून नेल्याचे वृत्त आले. आता मागे परत फिरणे नाही. अवघे मोहिते काठावरच राहिले. सरदार हाय खावून कालवश झाल. वंशज तेथेच वस्ती करुन राहिले. अकलूजच्या नदीकाठी आजही गाव आहे. एक छोटस गाव मोहित्यांच टणू हे त्या गावाच नाव. तिथे सारी घरे मोहिते यांचीच.

संतांची घौडदौड सुरुच राहिली. कधी मोघल तर कधी मराठा अकलूजवर राजघराणे राज्य करीत होते. इंग्रज आले तेव्हा अकलूजची सोळा आणे पाटीलकी होती मोहिते पाटीलांकडे. नारायणराव मोहिते गावचे पाटील होते. सणसरच्या लक्ष्मीबाईशी विवाहबध्द झालेले. लक्ष्मीबाईना लोक कबई म्हणत. लक्ष्मीबाईवर काळाचा जबरदस्त घाव बसला. तो म्हणजे नारायणराव मोहिते स्वर्गवासी झाले. त्यांना कृष्णा व मथुरा या दोन मुली होत्या.

कबई मोठ्या धिराच्या होत्या. त्यांनी गावगाडा व्यवस्थित सांभाळला. स्वतः पाटीलकी केली. लोक त्यांना कबई पाटील म्हणून ओळखत असत. वेळापूरचे माने-देशमुख मोठे तोलामोलाचं घराणं. त्यांचे आणि मोहिते-पाटील घराण्याचे ऋणानुबंध सोयरसंबंध जुळून आले. कृष्णाबाईचा आनंदराव आणि मथुराबाईचा गणपतरावांशी विवाह झाला.

"कबईने जावयाला अकलूजला आणले. पाटीलकीची सूत्रे दिली. सरकारही सुरळीत सुरु झाले. आनंदरावांना तीन मुले. थोरले मारोतराव माने, मधले शंकरराव माने आणि धाकटे सदाशिवराव माने. शंकररावांचा जन्म झाला तो दिवस १४ जानेवारी, मकरसंक्रातीचा होता. सूर्योदयाची वेळ, वार सोमवार होता. जन्मनांव "ख" वरुन खुशालदेव आणि "य" वरुन यशवंत ठेवण्यात आले. पण बारशाला नांव ठेवले "शंकरराव".[६]

## शिक्षण

नैसर्गिकरित्या दुष्काळनिडीत असलेल्या या अकलूज गावात शंकररावजींचे बालपण गेले. "अकलूज येथील प्राथमिक शाळेत सातवीच्या वर्गात शिकत असताना फायनल परीक्षा जवळ येत होती आणि वर्गात गुरुजींनी फी भरण्यास तगादा लावला होता. एकेदिवशी खापर्डे गुरुजींनी ज्यांनी अद्याप फी भरलेली नाही त्यांनी घरी जावे असे सांगितले व शंकररावजी गुरुजींना यावर्षी भयानक दुष्काळ पडल्यामुळे परीक्षेची फी कमी घ्यावी यासाठी ते सांगण्याचा प्रयत्न करु लागले. मात्र गुरुजी ऐकण्याच्या परिस्थितीत नव्हते. तेव्हा गुरुजींबरोबर वादावादी सुरु झाली. शंकरराव मोहिते-पाटील म्हणाले की, ही शाळा काय श्रीमंताच्या मुलांनीच शिकण्यासाठी आहे का काय? तेव्हा गुरुजी म्हणाले तुम्ही तसे



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

समजा, 'एवढा कळवळा आला असेल ना तर स्वत: त्यांच्यासाठी शाळा काढा. आन शिकवा फुकट चला आता आमचा वेळ नका घालवू".[७]

"हो हो, काढेनच शाळा, एक काय अशा छप्पन शाळा काढेन, तुम्ही फक्त कौरव-पांडवांना शिकवत रहा. गुरुजी मी एकलव्यासाठी शाळा काढेन" असे म्हणत शंकरराव त्वेषाने वर्गाच्या बाहेर पडले. तेव्हापासून त्यांना शाळा सोडावी लागली. शिक्षण बंद झाल्यावर नाउमेद न होता उत्तम शरीर कमावण्यावर त्यांनी आपले लक्ष केंद्रीत केले. गावोगावची कुस्ती मैदाने गाजविली. शिक्षण अर्धवट सोडलेले शंकरराव समाजजीवनाच्या शाळेत शिकू लागले व मोठे होऊ लागले.

**शंकरराव मोहिते-पाटील यांच्यावर इतरांचा पडलेला प्रभाव**

**१. क्रांतीसिंह नाना पाटील**

"सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील आणि क्रांतीसिंह नाना पाटील यांचा निकटचा संबंध होता. १९४२ च्या चलेजाव चळवळीत नाना पाटील यांच्यासमवेत भूमिगतांची चळवळ वाढविण्याचे महत्त्वाचे कार्य मोहिते-पाटील यांनी केले. या चळवळीत शंकररावजींचा सिंहाचा वाटा होता. त्यामुळे स्वातंत्र्य संग्रामाच्या लढ्यात त्यांचा सक्रीय भाग होता. अशा या स्वातंत्र्यसेनांनीनी नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रासाठी त्याग केलेला आहे. अशा अनेक सहकाऱ्यांशी त्यांचा संबंध होता."[८]

"वाळवा तालुक्यातील येडेमच्छिंद्र हे त्यांचे गाव. या गावातील पिसाळ पाटील घराण्यात त्यांचा जन्म झाला. सत्यशोधक समाजातील जलसे पाहून त्याचा प्रभाव त्यांच्यावर पडला. गांधीजींच्या १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी उडी घेतली."[९] त्यानंतर फरारी राहून अखंड भ्रमण व प्रचाराचे कार्य त्यांनी केले. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतीसिंहांचे कार्य महत्त्वपूर्ण असे आहे. महाराष्ट्र कर्नाटक प्रश्नावर त्यांनी लढा दिला. गोवा मुक्ती संग्रामात त्यांनी भाग घेतला. "शेतमालाला योग्य भाव देण्यासाठी लढा दिला. घामाच्या रुपाने रक्त गाळणाऱ्या शेतकऱ्याचे जिव्हाळ्याचे प्रश्न त्यांनी हाती घेवून त्यासाठी जन्मभर लढे देवून भारताच्या राजकीय व आर्थिक क्रांतीचा लढा पुढे नेऊन इतिहासात नाव अजरामर करणाऱ्या पुढील अनेक पिढ्यांनां मार्गदर्शक ठरेल"[१०]

असा हा महापुरुष एका युगपुरुषाप्रमाणे या भागात होऊन गेल्याने त्यांच्या कार्याचा ठसा सातारा, कोल्हापूर, सांगली येथे उमटला आहे व त्यांचा प्रभावही अनेक कर्तबगार व्यक्तींवर पडलेला दिसतो.

## २. कर्मवीर भाऊराव पाटील

कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे धडे दिले. "कष्ट करा व शिका" हा त्यांचा मूलमंत्र होता. त्यांनी सर्वसामान्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली होती. आचार्य अत्रे म्हणतात, "महाराष्ट्रात ज्ञानाची गंगोत्री चिपळूणकर, टिळक व आगरकर यांनी निर्माण केली." तिचे प्रवाह कर्व्यांनी स्त्री वर्गामध्ये पोहचवले तर बाबासाहेबांनी आपल्या लक्षावधी अस्पृश्य बांधवांच्या घरात ही गंगा पोहचवून त्यांच्या उध्दाराचा मार्ग मोकळा करुन दिला. कर्मवीरांनी काळे-नेर्ले या ठिकाणी प्रथम शाळा काढली व अज्ञानी लोकांना सूज्ञ करण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या या कार्याचा प्रभाव शंकरराव मोहिते-पाटील यांच्यावरती पडलेला दिसून येतो. त्यांनीही माळशिरस तालुक्यात "शिक्षण प्रसारक मंडळ" अकलूज ही शिक्षण संस्था काढली आहे. तसेच सर्वप्रथम त्यांनी विद्यार्थ्यांसाठी "विजय वसतिगृह" काढले. ते म्हणजे भाऊराव पाटील यांचाच प्रभाव म्हणावा लागेल.

## ३. यशवंतराव चव्हाण

यशवंतराव चव्हाणांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी झाला. त्यांची आर्थिक परिस्थिती गरिबीची होती. त्यांना शिक्षण घेताना खूप अडचणींना तोंड दयावे लागले. प्रथम त्यांनी सामाजिक कार्यास सुरुवात केली. नंतर ते राजकीय क्षेत्रात गेले व कॉंग्रेस पक्षाकडून मुख्यमंत्री झाले. आणि १९६० साली महाराष्ट्र लढ्यात त्यांचे मोलाचे काम आहे. त्यावेळेस यशवंतराव चव्हाणांना मदत करणारे सोलापूर जिल्हयात कार्य करणारे शंकरराव मोहिते-पाटील हे त्यांच्या पाठीशी होते.[11] तेंव्हापासून शंकररावजी व याशवंतराव चव्हाण यांचे संबंध अतिशय मैत्रीचे झाले. तेव्हापासून यशवंतराव चव्हाणांच्या कार्याचा प्रभाव शंकरराव मोहिते-पाटील यांच्यावर पडलेला दिसतो.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

## ४. राजर्षि छत्रपती शाहू महाराज

छत्रपती शाहू महाराज हे जन्मतः राजघराण्यातील नव्हते. ते कागलच्या घाटगे घराण्यातील होते. त्यांचा जन्म २६ जुलै १८७४ रोजी झाली. त्यांच्या माता व पित्याचे नांव अनुक्रमे श्रीमंत राधाबाई व श्रीमंत जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे असे होते. शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव असे होते. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष म्हणजे छत्रपती शाहू महाराज होते. सर्वसामान्य माणसांचे कल्याण करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले. आधुनिक काळात म्हाराष्ट्रात झालेल्या सामाजिक सुधारणांचा इतिहास पाहताना राजर्षि शाहू महाराज यांच्या कार्याची माहिती घेणे अपरिहार्य ठरते. आपल्या अठ्ठावीस वर्षाच्या कारकिर्दीत छत्रपती शाहू महाराजांनी अनेक उल्लेखनीय कामे केली. आपणास मिळालेल्या या सत्ता व अधिकाराचा उपयोग संस्थानातील सामान्यजनांच्या हितासाठी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. जातीसंस्थेच्याद्वारे निर्माण झालेली सामाजिक विषमता दूर करून समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्याच्या हेतूने त्यांनी बहुजन समाजाचे नेतृत्व स्वीकारले व सर्व जातीजमातींना गुणवत्तेनुसार समान संधी देण्याचे त्यांनी ठरविले होते. हा प्रभाव मोहिते-पाटील यांच्यावरती पडलेला दिसून येतो.

## ५. वसंतदादा पाटील

महाराष्ट्र राज्याच्या चळवळीत सहकारमहर्षिंनी सातारा जिल्हयातील नाना पाटील व सांगली जिल्हयातील वसंतदादा पाटील या भूमिगत कार्यकर्त्यांची राहण्याची व जेवणाची सोय सहकारमहर्षिंनी केली होती. तेव्हापासून वसंतदादांशी सहकारमहर्षिंचा घनिष्ठ संबंध आला होता. शेतकऱ्यांचे शेतीमालाचे खरेदी विक्रीचे व्यवहार शेतकऱ्यांच्या लहान लहान सहकारी संस्थांनी बनविलेल्या सहकारी खरेदी विक्री संघामार्फत होऊ लागले. कारण दादांच्या प्रयत्नामुळे मार्केट कमिटी स्थापन झाली. भारत देश कृषीप्रधान म्हणून ओळखू जाऊ लागला. कारण सुमारे ७० टक्के हून अधिक लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. त्यांची उपजिविका शेतीवरच चालते. शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारावे, त्यांच्या

गरजा पूर्ण करण्याची त्यांना ताकद यावी व राष्ट्रीय संपत्तीत वाढ व्हावी यासाठी शेतीच्या कच्च्या मालावर प्रक्रिया करून पक्का माल तयार करावयाचे कृषी उद्योगधंदे सुरु करण्याची आवश्यकता होती. शेतीवरील लोकसंख्येचा बोजा कमी करून तो उद्योगधंदयावर आणल्याशिवाय शेतकऱ्यांचा आर्थिक विकास होणार नाही व त्यांचे जीवनमान उंचावणार नाही ही वस्तुस्थिती होती. हे साध्य होण्यासाठी सहकाराची कास धरून प्रयत्न करावयास पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यादृष्टीने त्यांनी महाराष्ट्राच्या परिसरात प्रयत्न केले व दादांचे बऱ्याचवेळा शंकरराव मोहिते-पाटील यांना सहाय्य झालेले आहे. त्यांचा प्रभाव क्षणोक्षणी जाणवतो.

## ६. महर्षि विठ्ठल रामजी शिंदे

"ब्राह्मण, मराठे व अस्पृश्य या तीन मोठ्या जातीत ऐक्य झाल्याशिवाय महाराष्ट्राची प्रगती होणार नाही. ही एकी अजून न झाल्याने महाराष्ट्राचे राजकारण, समजाकारण, धर्मकारण ही सर्वच अडून राहिली आहेत" असे महर्षि शिंदे म्हणतात. त्यांचे समाजाच्या सर्वांगीण प्रगतीकडे लक्ष होते. महाराष्ट्रीयन माणसाने व्यापार व उद्योगधंदयात पडले पाहिजे असे त्यांचे मत होते. म्हणूनच ते म्हणतात, "ब्राह्मण असो वा मराठा असो, त्यांनी कधी यापूर्वी व्यापार केला नाही. त्याकारणाने आपणाकडे गुजर, मारवाडी वगैरे परप्रांतीयांचीच भरती झाली आहे. ब्राह्मणांनी तसेच मराठ्यांनी व्यापारात लक्ष घातले पाहिजे. भांडवल जमविणे, कारखाने काढणे, पतपेढ्या स्थापने ही कामे आपण केली पाहिजेत. हे महर्षि शिंदे यांचे विचार, या विचारांचा प्रभाव सहकारमहर्षि शंकराव मोहिते-पाटील यांच्यावर पडलेला दिसून येतो. कारण त्यांनी निर्माण केलेले विविध कार्यक्षेत्र साखर कारखाना, सूतगिरणी, दूध प्रकल्प, ग्राहक भांडार इ. एका मराठी माणसाचे उद्योगधंदे वगैरे व्यवसायामध्ये केलेली प्रगती ही उल्लेखनीय म्हणावी लागेल. तसेच शिंदेनी शेतकऱ्यांसाठी केलेले प्रयत्न, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी घेतलेल्या परिषदा अशा प्रकारचा कार्यक्रम त्यांनीही राबविला. सामाजिक व राजकीय नेत्यांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून तसेच त्यांच्या कार्याची गती कुंठीत होऊ न देता त्यांचे विचार ग्रामीण भागातील लोकांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी सहकार व शिक्षणाचा प्रसार करण्याची स्फूर्ती शंकरराव मोहिते-पाटील यांना महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्यापासून मिळाली आहे.

वरील सामाजिक, राजकीय, औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रातील नेत्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून तसेच त्यांच्या कार्याची गती कुंठीत होऊ न देता त्यांचे विचार ग्रामीण भागातील लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी सहकार, सामाजिक, औद्योगिक व शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्याची स्फूर्ती शंकरराव मोहिते-पाटील यांना मिळाली असेल. त्यामुळे शंकरराव मोहिते-पाटील यांनी सोलापूर जिल्हयाच्या सर्व ग्रामीण भागात सहकार, औद्योगिक व शैक्षणिक चळवळ सुरु करून लोकांचे आर्थिक व सामाजिक जीवनमान सुधारण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केलेले दिसून येतात. शंकरराव मोहिते-पाटील यांच्यावरती याशिवाय महात्मा जोतिबा फुले व छत्रपती शिवाजी महाराज यांचाही प्रभाव पडलेला दिसून येतो. फुलेंनी बहुजन समाजासाठी केलेले कार्य याचा प्रभाव पडलेला आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या राज्यकारभारामध्ये सर्व जातीजमातींना समान संधी देत होते. त्याचप्रमाणे शंकरराव मोहिते-पाटीलही आपल्या सामाजिक व राजकीय कार्यामध्ये सर्व जातीजमातींच्या लोकांना सामावून घेत असत व योग्य ठिकाणी योग्य व्यक्तींची पारख करून त्यांना काम करण्यास संधी देत असत.

अशाप्रकारे शंकरराव मोहिते-पाटील यांच्यावरती अशा थोर महापुरुषांचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

# वंश विस्तार

**नरसिंगराव मोन-देशमुख**

साहेबराव | गणपतराव | भोजराव | आनंदराव माने-पाटील व | कृष्णाबाई आनंदराव माने-पाटील

जिजाबाई | बाबासाहेब,माने-पाटील | सुशिलाबाई | शंकरराव माने-पाटील | सदाशिवरव माने-पाटील | कमल

दत्तक वडील
कै. नारायणराव मारोतराव मोहिते-पाटील

दत्तक आई व आजी
कै. लक्ष्मीबाई मोहिते-पाटील

कै. शंकरराव मोहिते-पाटील व कै. रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील

मुले :
१. श्री. विजयसिंह, पत्नी सौ. नंदिनीदेवी
२. श्री. जयसिंह, पत्नी सौ. सुलक्षणादेवी
३. श्री. राजसिह, पत्नी सौ. उर्मिलादेवी
४. श्री. मदनसिह, पत्नी सौ. कांचनमालादेवी
५. श्री. प्रतापसिंह, पत्नी सौ. पद्मजादेवी
६. श्री. उदयसिंह, पत्नी सौ. स्वयंप्रभादेवी

मुली :
१. सौ. जयश्रीदेवी
२. कै. सौ. अरुणादेवी
३. सौ. गिरीजादेवी



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

**शंकरराव मोहिते-पाटील यांची स्वभाव वैशिष्ट्ये**

"शंकरराव मोहिते-पाटील यांचा स्वभाव अत्यंत मनमिळावू, सर्वांवर सारखेच प्रेम करणारे, सर्वांच्या उपयोगी पडणारे, गरजूंची गरज भागविणारे. जबरदस्त संघटन कौशल्य, भाषण साधे पण अत्यंत प्रभावी व ग्रामीण स्तरांतील सर्वसामान्य व्यक्तीला सहजपणे समजेल, उमजेल अशा प्रकारचे त्यांची भाषणे असत. साधी राहणी व उच्च विचारसरणी या अनेक सद्गुणांमुळे त्यांना राजकारणात, सामाजिक कार्यात, शैक्षणिक क्षेत्रात, सहकार क्षेत्रात अनेक होतकरु व प्रामाणिक सहकारी मिळाले व यांच्या जीवाला जीव देणारी मित्रमंडळी त्यांना जमा करता आली."

त्यांना गरीब लोकांविषयी आस्था होती. कारण त्यांनी गरिबीचे चटके स्वतः अनुभवले होते. त्यांच्या जीवनामध्ये "जीवात जीवनमान असेपर्यंत जनसेवाच करु" हे त्यांचे ब्रीदवाक्य होते. यानुसारच ते सतत कार्यतत्परतेने सर्वसामान्य लोकांना मदत करीत असत. ते स्वतः गरीब लोकांच्या शेतात,घरी जात व अडीअडचणी विचारत व लोकांना मदत करीत असत. सर्वसामान्यांच्या घरी जाऊन चटणी भाकरी ते खात असत. ते लोकांना सतत सांगत असत की, "गरीबी आली म्हणून लाजू नये व श्रीमंती आली म्हणून मातू नये". ते लोकांमधील भांडणतंटे संमजसपणे मिटवीत असत व सर्व लोकांना समान न्याय देत असत. ते कोणावरही अन्याय होऊ देत नसत. जर एखाद्या व्यक्तीने अन्याय केला तर त्याला कडक शिक्षा ते देत असत. योग्य ठिकाणी योग्य व्यक्तीला संधी देत असत व लोकांचा विश्वास संपादन करीत असत. अशा प्रकारचा त्यांचा स्वभाव असल्यामुळे ते विविध पदांपर्यंत त्यांनी मजल मारलेली दिसते. या स्वभाववैशिष्ट्यांमुळे व त्यांच्या कार्यामुळे ते महाराष्ट्रभर परिचित आहेत.

**स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग**

"शंकरराव मोहिते-पाटील यांनी स्वातंत्र्य चळवळीमध्येही हिरीरीने भाग घेतल होता. १९४२ साली सहकारमहर्षिंनी व त्यांच्या दोन बंधूनी भूमिगत चळवळ चालू ठेवण्यासाठी अतिशय प्रयत्न कले होते. तारा तोडणे, पोस्ट जाळणे, बुलेटीनचा प्रचार करणे, तसेच क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या भूमिगत कार्यकर्त्यांना जरुर ती सर्व मदत व सहकार्य

केले. अकलूज येथे १९३६ साली कॉंग्रेस सेवादलाची स्थापना करुन इंग्रज सरकारविरुध्द लोकमत तयार केले होते.[१३]

१९४२ च्या भूमिगत चळवळीमध्ये त्यांनी सक्रीय भाग घेतला. "अकलूजमध्ये नाना पाटील यांचे पत्री सरकारचे लोक आश्रयासाठी आले होते. त्यांना आपल्या शेतामध्ये त्यांनी सुरक्षितपणे ठेवण्याची व्यवस्था केली होती. अकलूजपासून दोन किमी अंतरावरती 'बेरडवाडी' म्हणून एक छोटी वाडी होती. बेरडवाडीच्या अलीकडे असलेल्या त्यांच्या शेतास 'ढेल्याचे शेत' असे म्हणत. तिथे त्यांची व्यवस्था केली होती."[१४] शंकररावजी दररोज त्यांच्यासाठी जेवण घेवून सायकलवरती जात असत. सायकलवरती जात असताना ते सावधपणे वागत असत. कारण भूमिगत कार्यकर्त्यांना ते प्रत्यक्षपणे मदत करीत होते. भारतमातेला इंग्रजांनी पारतंत्र्यात जखडून ठेवले होते. व्यापारी म्हणून आलेले राज्यकर्ते बनले होते. भारतमातेची स्वातंत्र्याची आर्त हाक ऐकून देशाचा कण न कण व्याकुळला होता. तिच्या मुक्तीसाठी काही वेडी मुले झपाटून उठली होती. महाराष्ट्र तर वीर शिवाजींची पावनभूमी. त्यामुळे महाराष्ट्रात अनेक तरुण मुले स्वातंत्र्य चळवळीत सामील झाली होती. त्यांनी जुलमी इंग्रज सरकारविरुध्द दंड थोपटले होते. नाना पाटील यांच्या पत्री सरकारच्या कारवायांनी इंग्रज सरकार हैराण झाले होते. शंकररावजी, बाबासाहेब आणि सदुभाऊ या तिघा भावांच्या संरक्षणाखाली नाना पाटील यांचे असंख्य कार्यकर्ते बेरडवाडीच्या ढेल्यात नीरा नदीचे पाणी पिऊन व शंकररावजींच्या कबई आजीच्या हातच्या भाकरी खाऊन इंग्रज सरकारशी लढा देत होते. शंकरराव मोहितेंचा लहानपणापासूनचा एक मित्र नाना गवळी यानेही शंकररावांना या कामी भरपूर मदत केली. एके दिवशी शंकरराव मोहिते हे भाकरी देवून पटकन माघारी निघाले. तेव्हा भूमिगत कार्यकर्त्यांपैकी नाथाजी लाड यांनी विचारले की, आज काय पाटील गडबड आहे. तेव्हा शंकरराव म्हणाले की, "मी थांबलो असतो पण ... पण काय? असे विचारले असता शंकरराव म्हणाले, "सणसरला आमच्या बहिणीकडे गेल्या महिन्यापासून एस. एम. आणि त्यांचे मित्र उतरलेत. त्यांची व्यवस्था पहावी लागेल". तेव्हा पत्री सरकारचे कार्यकर्ते आश्चर्यचकित झाले व म्हणाले की, "म्हणजे ! एस. एम. पण तुमच्याकडेच?" तेव्हा शंकरराव म्हणाले की, "होय सणसरला ठेवलय त्यांना. बहिणीचा जुना वाडा आहे. मोठमोठ्या भिंती आहेत.

त्या भिंतींच्या आड ती अगदी सुरक्षित आहेत.".[१५] परवा चेकींग आल होत. पण कोणीही सापडल नाही. असे सांगितल्यावर भूमिगत कार्यकर्ते म्हणाले की, 'म्हणजे आता अकलूज हे स्वातंत्र्यसैनिकांचे आश्रयस्थान्च झालेले आहे. तेव्हां शंकरराव म्हणाले की, नाथाजीराव नका आम्हाला लाजवू. जेवढी आमच्या हातनं भारतमातेची सेवा होती आहे तेवढी होऊ दया. तेव्हा मी निघतो पुढील हालचाल कळाली पाहिजे म्हणून शंकरराव 'जय हिंद!' म्हणून निघून गेले".[१६]

अशा प्रकारे शंकरराव मोहिते-पाटील यांनी १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये हिरीरीने भाग घेतला होता व त्यांनी भूमिगत चळवळीमध्ये अनेक भूमिगत कार्यकर्त्यांना आवश्यक ती मदत केलेली होती. त्यामुळे त्यांना स्वातंत्र्य मिळाल्याचा भरपूर आनंद झाला होता.

"१९४६ साली क्रांतीसिंह नाना पाटील यांचेवरील बंदी सरकारने उठविल्यामुळे त्यांचा तुफानी दौरा सातारा जिल्हयात चालू होता. त्यावेळी अकलूजहून श्री. शंकरराव मोहिते, श्री. बाबासाहेब पाटील, श्री. सदाशिव पाटील हे सेवादल सैनिकांसह ३/४ मालमोटार ट्रक भरुन दहिवडी व वडूजला क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या सभेला गेले होते. त्यावेळी नाना पाटील यांनी अकलूजला भेट दयावी म्हणून त्यांना निमंत्रण दिले होते. परंतु एक महिन्याचा दौरा निश्चित झाल्याने तूर्त अशक्य आहे असे नाना पाटील म्हणाले".[१७] तरीपण तुमच्या आग्रहाखातर लवकरच येऊ. परंतु त्यासाठी श्री. रघुनाथ माने यांना आमचेबरोबर काही दिवस थांबू दया. त्यांचेजवळ निश्चित तारीख देऊ असे देशभक्त नाथाजीराव लाड यांनी शंकररावजी यांना सांगितले. तेव्हा शंकरराव मोहिते-पाटील यांनी श्री. रघुनाथ माने यांना तेथेच थांबवण्यास सांगितले. तेव्हा दि. ५-५-४६ ते दि. १०-५-४६ पर्यंत क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या तुफानी दौऱ्यात सहभागी होण्याची संधी श्री. रधुनाथ माने यांना शंकरराव मोहिते-पाटील यांनी दिली."[१८] तसेच सोलापूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे सेक्रेटरी देशभक्त एम. डी. विभूते हेही या दौऱ्यात होते. मग या दोघांच्या व शंकराव मोहिते-पाटील यांच्या आग्रहाखातर मुंबईचा दौरा रद्द करुन सोलापूर जिल्हयाचा दौरा निश्चित केला आणि २०-५-४६ ला नातेपुते, माळशिरस, अकलूज, वेळापूर व सोलापूर जिल्हयाचा दौरा झाला." त्यावेळी अकलूज येथे क्रांतीसिंह नाना

पाटील व त्यांचेबरोबर १० ते १२ ट्रक व ८ ते १० जीपमधून त्यांचे सुमारे ५००ते ६०० सहकारी अकलूजला आले होते. प्रचंड मिरवणूक व जंगी सभा बाजार पटांगणात झाली होती व सर्वांची जेवणाची उत्तम सोय शंकरराव मोहिते-पाटील यांनी स्वत:च्या वाड्यात केली होती. तेव्हापासून त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे व आपुलकीचे संबंध क्रांतीसिंह नाना पाटील यांचेशी झाले होते."[१९] तसेच वसंतदादा पाटीलसुध्दा भूमिगत असताना अकलूजला जात असत.

अशा प्रकारे स्वातंत्र्य चळवळीच्या काळात शंकरराव मोहिते-पाटील यांनी लोकजागृतीचे काम केलेले आहे व १५ ऑगस्ट १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. अकलूजमध्ये शंकरराव मोहिते-पाटील यांच्या हस्ते तिरंगा झेंडा फडकवला गेला व रात्रभर अकलूजमध्ये स्वातंत्र्य मिळाल्याचा आनंदोत्सव शंकरराव मोहिते-पाटील व त्यांचे सहकारी यांनी साजरा केला. कारण राष्ट्रासाठी त्यांनी त्याग केला होता."[२०]

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर देशातले कर्तृत्ववान पुरुष नव्या उत्साहाने कार्याला लागले. देशात एक नवे चैतन्य संचारले. लोक सहकारमहर्षिंना काकासाहेब म्हणत असत. काकासाहेबांनी आपला वैयक्तिक प्रपंच थाटण्याऐवजी समाजसंस्था स्थापण्यास प्रारंभ केला. त्यांच्या विचारांचा, कल्पकतेचा आम्रवृक्ष मोहरु लागला. महाराष्ट्राच्या मातीची सेवा अंत:करणपूर्वक करायची असा त्यांनी निश्चय केला. स्वत:पुरते जगणे हे एक प्रकारचे मरण होय हे लक्षात घेऊन त्यांनी रंजल्या गांजलेल्यांची मनोमन सेवा करण्याचा दृढ निश्चय केला व त्यांनी 'जीवात जीवनमान असेपर्यंत समाजसेवाच करु' या ध्येयाने त्यांची सदैव वाटचाल चालू होती.

अशा प्रकारे शून्यातून विश्व निर्माण केलेले शंकरराव मोहिते-पाटील अख्या महाराष्ट्राला परिचित आहेत.

**समारोप**

'सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील ग्रामीण नेतृत्वाचा एक अभ्यास' या प्रबंधातील पहिल्या प्रकरणामध्ये शंकरराव मोहिते-पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सविस्तर उल्लेख करण्यात आला आहे. यात शंकरराव मोहिते-पाटील यांचा जन्म, बालपण, शिक्षण,

घराण्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी तसेच संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अकलूज हे गाव प्रसिध्द आहे व आशिया खंडातील सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे. अकलूज हे सहकारमहर्षिंची कर्मभूमी आहे. त्यामुळे अकलूज गावाची व्युत्पत्ती कशी झाली याची माहिती या प्रकरणामध्ये आहे. त्याचप्रमाणे शंकरराव मोहिते-पाटील यांच्यावरती इतर सामाजिक व राजकीय लोकांचा पडलेला प्रभाव याचा उल्लेख आहे व त्यांच्या दोन्ही माने व मोहिते घराण्यांचा वंश विस्तार दाखविण्यात आला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी स्वातंत्र्यलढ्यामध्ये कशा प्रकारे भाग घेतला याचीही माहिती या प्रकरणामध्ये आली आहे. संशोधनाच्यादृष्टीने या सर्व मुद्यांचा उल्लेख केला आहे. शंकरराव मोहिते-पाटील यांचे व्यक्तिमत्त्व काही प्रमाणात अनुकूल व काही प्रमाणात प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत घडलेले आहे.

सहकारमहर्षिना शिक्षण घेताना अनेक समस्यांना तोंड दयावे लागले. शिकण्याची इच्छा असताना गरीबीमुळे सातवीतून शिक्षण सोडावे लागले. त्यांच्या शैक्षणिक जीवनात कटू अनुभवाचे वर्णन त्यांचे नेतृत्व विकसित करण्यास कसे उपयोगी पडले याचा पाठपुरावा केला आहे. एकंदरीत शंकरराव मोहिते-पाटील यांचे नेतृत्व शिक्षण बंद झाल्यानंतर व्यावहारिक जीवनाच्या शाळेत विकसित झाले हे त्यांच्या व्यक्तीमत्त्व परिचयावरुन सिध्द होते.

## संदर्भ


१. विश्वनाथ शामराव पाटील रौप्यमहोत्सवी स्मरणिका, सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि., अकलूज (१९६२-१९८७), पृ. ७०

२. दादासाहेब खाशेराव जगताप स्मरणिका, १४ जानेवारी, १९९३, पृ. ४८

३. प्रमोद जोशी स्मरणिका, १४ जानेवारी १९९३, पृ. ९२

४. रामभाऊ जोशी, चैतन्य स्मरण, पृ. १२

५. प्रमोद जोशी, परिस स्पर्श, प्रकाशक सहकारमहर्षि शंकरराव मोहिते पाटील स्मरणिका कमिटी, अकलूज, १९९७, पृ. २

६. उपरोक्त, पृ. ६

७. उपरोक्त, पृ. ११

८. रौप्यमहोत्सवी स्मरणिका, सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि., अकलूज (१९६२-१९८७), पृ. ४६

९. दैनिक पुढारी, २७-८-१९९३

१०. पाटील रा. जु., क्रांतीसिंह नाना पाटील, पृ. ४८

११. देशमुख पंजाबराव, कर्मवीर भाऊराव पाटील, पृ. ८७

१२. दैनिक सकाळ, वर्धापनदिन विशेषांक, सोलापूर आवृत्ती, पृ. ५

१३. प्रा. मोहनराव काळे, सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील, पृ. २

१४. प्रमोद जोशी, परिस स्पर्श, प्रकाशक सहकारमहर्षि शंकरराव मोहिते पाटील स्मरणिका कमिटी, अकलूज, १९९७, पृ. १

१५. उपरोक्त, पृ. २

१६. उपरोक्त, पृ. २

१७. रघुनाथ रामचंद्र माने गुरुजी स्मरणिका, १४ जानेवारी १९९३, पृ. ८९

१८. उपरोक्त, पृ. ९०

१९. लोकराज्य, दिनकरराव माने, १६ जानेवारी १९९३, पृ. ३९

२०. लोकराज, प्रमोद जोशी, १६ जानेवारी १९९३, पृ. २३